दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -२५७ मंगळवार,दि.२० मे २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-257 | Tuesday, Dt.20 May 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडच्या विकासासाठी वाढीव निधीसह ५७५ कोटींचा आराखडा सादर - उपमुख्यमंत्री अजित पवार



## माजीमंत्री धनंजय मुंडे यांची प्रकृती अस्वस्थ असतानाही दादांच्या दौऱ्यात त्या घटनेनंतर ते पहिल्यांदाच झाले सक्रिय सहभागी..!





प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे.आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, माजी मंत्री धनंजय मुंडे,उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. तर समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला.

या बैठकीमध्ये वर्ष २०२४-२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले.मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली.

वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे.पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला. यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रीडागण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे.

पुढील काळात बीड जिल्ह्याला निधी थेट वर्ग होणार नाही तर..

गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या.दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे.

### दादांच्या पालकत्वात बीड जिल्ह्याला मिळाला रेकॉर्ड ब्रेक निधी..

गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता. यात वर्ष २०२५-२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटीच करण्यात आला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय. त्याचबरोबर आजपर्यंत डीपीडीसी अंतर्गत बीड जिल्ह्याच्या विकासासाठी जो निधी मंजूर झाला त्यामध्ये दादांच्या पालकमंत्रीच्या कार्यकाळातील यावर्षीचा हा सर्वाधिक रेकॉर्ड ब्रेक करणारा निधी मंजूर झाल्याने बीड जिल्ह्यात विकासाची कामे आता दृष्टीपथात दिसू लागतील.

### नियोजन समिती मधील प्रत्येक कामासाठी आता नवीन नियम अटी..

नियोजन समितीमधील कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये. तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत. प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत.कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे.

### बीड नगरपालिकेवर व्यक्त केली स्पष्ट नाराजी..

बीड नगरपालिकेचा काय आणि कसा कारभार सुरू आहे तो माझ्यापर्यंत आलेला आहे.मुख्याधिकारी नीता अंधारे मॅडम आपण आपल्या कामकाजात सुधारणा करा, अन्यथा मला कठोर निर्णय घ्यावा लागेल. बीड शहरातील नागरिकांना जर दोन दोन महिने पाणी मिळत नसेल, नाल्यांची स्वच्छता होत नसेल, रस्त्यांची साफसफाई होत नसेल, बिंदुसरा नदीमध्ये टाकत असलेल्या घाणीमुळे शरीरातील नागरिकांचे आरोग्य बिघडणार असे असेल तर कठीण आहे. यापुढे असे चालणार नाही असे स्पष्ट सुनावले. त्यामुळे बीड नगरपालिके अंतर्गत जर सुधारणा झाली नाही, नागरिकांना मूलभूत सुविधा वेळेवर मिळाल्या नाहीत तर मुख्याधिकाऱ्यांवर कारवाई होणार हे निश्चित.

### माजीमंत्री धनंजय मुंडे यांची प्रकृती अस्वस्थ, तरीही जिल्ह्याच्या विकासासाठी उपस्थिती...

बीड जिल्हा नियोजन विकास आराखड्याच्या बैठकीला बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री धनंजय मुंडे आवर्जून उपस्थित होते. विशेष बाब म्हणजे त्यांची प्रकृती अजूनही अस्वस्थ आहे.बोलण्याचा त्रास होतो, नजर स्थिर राहत नाही, शारीरिक अंतर्गत होत असलेल्या वेदना त्यांच्या हालचालीवरून चेहऱ्यावरून स्पष्टपणे जाणवत होत्या.असे असताना सुद्धा त्यांनी परळी येथे पालकमंत्री अजित दादांचे स्वागत केले. विकास कामांचा आढावा घेतला. अंबाजोगाईत विकास कामांच्या आराखड्याला उपस्थित राहिले. बीड येथे झालेल्या नियोजन बैठकीला आणि त्यानंतर आपल्या नेत्याच्या पत्रकार परिषदेला त्यांनी पूर्णवेळ दिला.एवढेच नव्हे तर गेवराई येथील विविध कार्यक्रमांना देखील त्यांनी उपस्थिती लावून बीड जिल्ह्याच्या विकासाबद्दल असलेली तळमळ स्पष्ट केली.



# टकरीत दोन काळवीट विहिरीत पडले ; एकाचा मृत्यू, एक जखमी

जखमी काळवीटावर सर्पराज्ञीत उपचार सुरु; मृत काळवीटावर झापेवाडी येथे अंत्यसंस्कार

प्रतिनिधी @ शिरूर कासार



पाडळी तालुका शिरूर कासार येथील शेतकरी पाखरे सखाराम यांच्या शेतामध्ये सकाळी दोन काळवटांमध्ये टक्कर चालू असताना शेतात जमिनीलगत असलेल्या विहिरीत दोन्हीही काळवीट पाय घसरून सात परस खोल विहिरीत पडले. त्यात एका काळविटाचा जागीच मृत्यू झाला. तर एक काळविटाचा पाय मोडला.

जखमी काळविटावर सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात उपचार सुरू असून मृत काळवीटावर झापेवाडी येथील वनपरिक्षेत्रात अंत्यविधी करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, पाडळी येथील शेतकरी सखाराम पाखरे यांच्या शेतामध्ये आज दिनांक १९सोमवार रोजी सकाळी दहाच्या सुमारास दोन काळविटांमध्ये जोरदार टक्कर चालू होती. या टकरीमध्ये एकमेकांना धडका देत असताना जमिनीलगत असलेल्या सात परस खोल विहिरीत दोन्ही कावीट पाय घसरून पडले. त्यात एक काळवीट जागीच मृत्यू झाला तर एका काळवीट जखमी झाले.

विहिरीत पडलेल्या काळविटांची माहिती पाडळी येथील सरपंच गहिनीनाथ पाखरे यांनी वन विभागाला दिली. त्यानंतर या घटनेची माहिती वन विभागाने तात्काळ सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रास दिली. त्यानंतर तात्काळ सर्पराज्ञीचें संचालक सिद्धार्थ सोनवणे ,सृष्टी सोनवणे हे घटनास्थळी दाखल झाले .

विभागीय वन अधिकारी अमोल गरकळ वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत काळे वनपाल अजय देवगडे वनरक्षक जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या मदतीने श्रीराम इंगळे व अशोक इंगळे या दोन बंधूंनी सात परस खोल विहिरीत उतरून या काळवीटास सुखरूप बाहेर काढले.

(उर्वरीत पान २ वर)

# बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना ना.अजितदादांकडून सकारात्मक मंजुरी

प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१९) रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी असलेले विविध विषय आणि विकासकामे ना.अजितदादा आणि समितीसमोर प्रस्तावित केली. त्यावर ना.अजितदादांनी प्रस्तावित केलेल्या विविध कामांना विकास निधी देण्यासाठी सकारात्मकता दर्शवत, निधी मंजूरीसाठी आदेशीत केले. तसेच बीड मतदारसंघातील अनेक महत्वाच्या कामांना मंजुरी दिली. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादांचे बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आभार मानले आहेत.



### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले बीड मतदारसंघाच्या वतीने आभार

खालील कामांना मिळाली मंजुरी

बीडच्या विमानतळ उभारणी करता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी

(उर्वरीत पान २ वर)

# बलात्काराच्या गुन्हयात संदिप पगारे यास अजन्म कारावास

प्रतिनिधी @ बीड

अंभोरा पोस्टे हद्दीतील शिरापुर येथील संदिप अंबादास पगारे वय ३७ याने एका अल्पवयीन मुलीचे लैंगिक शोषण केले होते त्या मुलीस दिवस गेल्यानंतर या कुकृत्याला वाचा फुटली होती. पिडीत मुलीच्या आईने अंभोरा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर गुन्हा दाखल होवून सदर गुन्हयाचा प्रारंभिक तपास आष्टी पिंक पथकाचे सपोनी धरणीधर कोळेकर यांनी केला होता, पुढे न्यायालयीन आदेशाने बीड पोलीस अधिक्षकांनी या गुन्हयाचा तपास एएच टियु च्या सपोनी सुरेखा धस यांच्याकडे वर्ग झाल्यानंतर तपास पुर्ण करून त्यांनी मा. न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते हा खटला जिल्हा व सत्र न्यायालयाच्या ०१ नंबर कोर्टात चालला, आज दि१९-०५-२०२५ रोजी आर एस पाटील मॅडम यांनी संदीप पगारे यास दोषी ठरवून अजन्म कारावास आणि२५००० दंडासह कलम५०६ मध्ये सहा महिणे कारावास व५०० रुपये दंड आणि दंड न भरल्यास१५ दिवस साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली.

# इथे बसताना किती वेदना आणि त्रास झाला असेल ?



प्रतिनिधी @ बीड

महाराष्ट्राच्या राजकारणात स्वकर्तृत्वावर राजकीय दबदबा निर्माण करणारे बीड जिल्ह्यामध्ये च नव्हे तर राज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आणि पुढे नंतर अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला सत्तेत सन्मानाची संधी देण्यासाठी प्रमुख नेतृत्व म्हणून माजी मंत्री धनंजय मुंडे ओळखले गेले. मात्र मागील काही घडलेल्या घडामोडीमुळे कुठेही थेट संबंध नसतानाही कॅबिनेट मंत्रीपद आणि बीड जिल्ह्याचा पालकमंत्री पद नाहक गमवावे लागले.

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# वडवणीतील भारतीय स्टेट बँकेच्या एटीएमची सेवा सुरळीत न केल्यास भाजपाचा आंदोलनाचा इशारा

## तहसीलदार यांना दिले लेखी निवेदन

प्रतिनिधी @ वडवणी

वडवणी शहरात असणाऱ्या भारतीय स्टेट बँकेचे एटीएम मध्ये गेल्या अनेक दिवसापासून पैशाचा खडखडाट असून त्यामुळे एटीएम धारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे त्यामुळे शहरातील एटीएम हे शोभेच्या वस्तू बनल्याचे दिसून येत आहे.तरी शहरातील सर्व एटीएमची सेवा सुरळीत न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपच्या वतीने तहसीलदार यांना काल सोमवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

भारत सरकार, मोदी सरकार डिजिटल इंडिया व कॅशलेस व्यवहारासाठी प्राधान्य देत आहे बँकेचे सर्व व्यवहार हे डिजिटल व कॅशलेस करण्यासाठी सरकार सक्ती करून प्रगतीचे पावले उचलत




असताना याला वडवणी तालुका मात्र अपवाद असल्याचे दिसून येत असून वडवणी शहरात भारतीय स्टेट बँकेची एक शाखा असून यामध्ये हजारो खातेदार असून या खातेदारासाठी व एटीएम धारकांसाठी वडवणी शहरात बँकेच्या शाखेजवळ एक ,हायवे रोड येथे एक व चिंचवण रोड येथील एक असे तीन एटीएम मशीन असून या एटीएम मशीन म्हणजे वडवणी करांना असून अडचण नसून खोळंबा अशी म्हणण्याची वेळ आलेली आहे यामध्ये भारतीय स्टेट बँक ही एटीएम धारकांना एटीएम वापरण्यासाठी बँक धारकाच्या खात्यातून पैसे कपात करत असते परंतु गेल्या दहा पंधरा दिवसापासून या तीनही एटीएम मध्ये पैशाचा खडखडाट असून एखाद्या एटीएम मध्ये थोडे फार पैसे येतात व ते लगेच संपतात त्यामुळे एटीएम धारक हा उघडे एटीएम पाहून आत मध्ये जातो परंतु एटीएम मध्ये पैसे नसल्यामुळे कार्डधारकांना निराशा पोटी परत जावे लागत आहे . तसेच एटीएम मध्ये नेट, एसी,विद्युत सेवा सुरू नसते, एटीएम मध्ये स्वच्छता नसते त्यामुळे भारतीय स्टेट बँक एटीएम धारकांना व्यवस्थित सुरळीत सेवा देत नसल्यामुळे एटीएम धारकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे तरी भारतीय स्टेट बँकेच्या वरिष्ठ अधिकारी यांनी तात्काळ याविषयी लक्ष देऊन एटीएम धारकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी एटीएम मधून दररोज पैसे उपलब्ध करून द्यावेत व सेवा सुरळीत करावी नसता भाजपचे वतीने,कार्ड धारकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन करण्याचा इशारा तहसीलदार यांना काल सोमवार रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे भाजपचे नेते संजय भाऊ आंधळे, महादेव सावंत भाजपा वडवणी तालुका उपाध्यक्ष, युवा नेते बालासाहेब मायकर, संजय नेमटे,वचिष्ट सवासे इत्यादीनी दिला आहे.या लेखी निवेदनाच्या प्रति मा.ना.पंकजाताई मुंडे पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य, माजी खा. डॉ. प्रीतम ताई मुंडे, हंसराज अहिर ओबीसी मागासवर्गीय आयोग राष्ट्रीय अध्यक्ष यांना हि देण्यात आले आहेत.

# संपादकीय

## दिलासा आणि सुकून

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात दिलासा आणि सुकून या दोन गोष्टी अतिशय आवश्यक आणि अत्याधिक गरजेच्या असतात. आपलं नॉर्मल आयुष्य सुरु असतं. कधी उन्हाळे पावसाळे झेलत तर कधी गुलाबी थंडी अनुभवत आपण आयुष्य जगत असतो....खूप काही जगावेगळ्या अपेक्षाही आपण बाळगलेल्या नसतात. कधीकधी आंतर्मुख होऊन विचार केल्यावर लक्षात येतं की, सगळं आहे पण दिलासा आणि सुकून नाहीये बरं...कुणाच्या नुसत्या असण्याने तर कुणाच्या नुसत्या हसण्याने मनाला सुकून मिळतो. कुणीतरी नुसतं पाठीवर हात ठेवून स्वतःच्या अस्तित्वाचा अनुभव दिला तरी केवढा तरी दिलासा मिळतो. तु जगाच्या पाठीवर कुठेही असं, तुझं असणं हाच सुकून आहे. कशाला काळजी करतोस रे. मी आहे हा दिलासा खूप काही देऊन जातो.

सुकून हा मोकळा श्वास आहे....तो फक्त असला तरी सौख्याचा भास आहे....तो सेक्स आणि सगळ्याच्या पलीकडे आहे. तो वैराण वाळवंटातील ओएसिस सारखा सुखद आहे. नातेवाईकांच्या भाऊगर्दीत तो किंवा ती नुसती दिसली तरी हुश्श आलास तु... चा निर्भेळ आनंद आहे. एखाद्या अस्वस्थ रात्रीत निद्रानाशाच्या बेचैनीत कुणीतरी नुसतं अलवारपणे केसांतून हात फिरवावं तसा आहे. बहिणीने अलवार मायेने भरवलेला घास आहे. कोणीतरी प्रवासातून दमून आल्यावर चेपून दिलेल्या तळपायांचा रिलिफ आहे. ऐक ना, झोपला नाहीयेस ना तू? म्हणत झोपेतून खाडकन जागं करुन हक्काने मारलेल्या गप्पांसारखा आहे. सुकून मिळेल असं कोणीही असू शकते. तुमची बायको, नवरा, मित्र, मैत्रिण,प्रेयसी...भाऊ, बहीण. कोणीही...

दिलासा आणखीन गमतीशीर...एखाद्या अशक्त देहात हेमगर्भाची मात्रा उगाळून दिलेल्या संजीवनीसारखा तो काम करतो. दिलासा फुंकर घालतो, आतल्या चैतन्यावर. भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे या स्वामी आश्वासनात तोच असतो. तुम्हाला दिलासा कोणीही देतो...देऊ शकतो. अंधाऱ्या वाटेवरून जाताना एखाद्या भिकाऱ्याच्या अस्तित्वाचा कृतज्ञ दिलासा असतो. परिक्षेला जाताना, चिंता मत करो टाईमपे छोड दुंगा सेंटरपर म्हणणारा एखादा अनोळखी रिक्षावालाही तुम्हाला दिलासाच देतो. आयुष्यातील दुविधेवर योग्य मार्ग दाखवून, तु चल मी आहेच म्हणणारा एखादा मित्रही दिलासाच असतो.....

सुकून आणि दिलासा दोन्ही महत्वाचे. प्रत्येकाच्या आयुष्यात ते असतातच. जोपर्यंत तुमची अहंकाराची, गर्वाची आणि मग्रुरीची कुंपणे ताठ आणि घट्ट असतात तोवर हे दोघेही कुंपणाबाहेर फिरत असतात. एकदा ती कुंपणं तुटली की ते दोघेही तुम्हाला उराउरी भेटतात.... पण या दोन्ही गोष्टी आयुष्यात हव्याच बरं का...! त्या किती महत्वाच्या आहेत ते त्यांच्या प्राप्ती शिवाय समजणार नाही. तुमच्यापैकी प्रत्येकाला आयुष्यात सुकून आणि दिलासा मिळत राहो हीच शुभेच्छा.



## समाजसेवक सातिराम ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी @ बीड

दरवर्षी प्रमाणे यावर्षी हि बार्शी नाका परिसरातील सर्व परिचित असणारे समाजसेवेत स्वतःला वाहून घेणारे गोरगरिबांना अडचणीच्या वेळी मदत करणारे बांधकाम क्षेत्रातील सुप्रसिद्ध उद्योजक समाजसेवक सातिराम आणा ढोले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अशोक दादा ढोले पाटील संस्थापक अध्यक्ष सातिराम आणा ढोले पाटील सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड वतीने २० मे रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत स्थळ जिल्हा रुग्णालय बीड येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यात सर्व ब्लड बँकेत रक्ताचा तुटवडा झालेला आहे. आपण सर्व रक्तदात्यांनी उस्फूर्तपणे येऊन रक्ताचा तुटवडा भरून काढण्यास सहकार्य करण्याचे आवाहन उपाध्यक्ष प्रकाश तावरे,किरण गलधर,सतिष जाधव सचिन तेलप, राजु ढोले संभाजी ढोले, ज्ञानेश्वर देवळेकर, अशोक दातवासे भरत वाणी, गणेश शिंदे, सनी शिंदे,सौरभ मुंडे, महादेव सानप,शशांक धन्वे,व संतोष जोगदंड,व संपुर्ण एम एस कन्स्ट्रक्शन मित्र परिवार व सातिराम आणा ढोले सामाजिक फाउंडेशन महाराष्ट्र राज्य बीड यांनी केले आहे.

# सतरा वर्षांपूर्वी विखुरलेल्या पाखरांनी पुन्हा एकदा भरविला १० चा वर्ग

प्रतिनिधी @ शिरूर कासार

येथील कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या ठिकाणी २००८ सली इयत्ता दहावीच्या वर्गामध्ये शिकत असलेल्या मित्र-मैत्रिणींचा गेट-टुगेदर चा कार्यक्रम पार पडला शाळा व महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थी म्हणून आयुष्याला आकार देण्यासाठी एकवटलेली निरागस जीव आयुष्याच्या पुढच्या लढाईमध्ये वेगवेगळ्या मार्गाने विभक्त होत असतात सातत्याने एक दोघांची भेट होत असते परंतु एकत्र शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे मित्र-मैत्रिणींचे पुन्हा भेट व्हावी याकरता अलीकडच्या काळात गाजलेला माजी विद्यार्थी मेळावा म्हणजेच गेट-टुगेदर या कार्यक्रमाच्या माध्यमातून हा विखुरलेला परिवार एका ठिकाणी जमा होतो त्यावेळी झालेला आनंद हा शब्दात व गगनात न मावणारा असतो.

त्याचप्रमाणे या कार्यक्रमांमध्ये २००८ सालीचे शिक्षक यावेळी आवर्जून उपस्थित राहिले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कालिका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सन्माननीय आप्पासाहेब येवले सर त्याचप्रमाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले सुधाकर खोले सर, च.थ.जायभाय सर, रवींद्र बडे सर, अंबादास बडे सर त्याचप्रमाणे सर्वांच्या आवडीचे असणारे श्रीहरी येडे सर हे देखील या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते प्रमुख अतिथी व कार्यक्रमाचे अध्यक्ष यांच्या उपस्थितीत दिपप्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी कार्यक्रमाचे स्वागत गीत मनीषा शेलार यांनी गायले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमा गायके व स्नेहा तांबट यांनी केले व प्रस्तावना अश्विनी रणखांब यांनी केले.या कार्यक्रमाचे आयोजक श्री.राम कोकाटे, अरविंद फरताडे, संकेत थोरात, प्रतीक भांडेकर आदींनी केली होती

यावेळी उपस्थित वर्गातील असलेले स्नेहल सव्वाशे, अश्विनी रणखांब, गीतांजली तांबे, उमा गायके , ज्योती येवले, कोमल



फुलभटी, स्नेहा तांबट, अश्विनी फुलथे, रितू वाघमारे, शाईन शेख, अंबिका गिरी. संकेत थोरात ,दीपक केरकळ ,वैभव शेलार ,पंकज पावशे ,राम कोकाटे

,सुनील पवार ,अमोल बर्डे ,इसाक शेख ,राम सव्वाशे ,अभिजीत गाडेकर ,स्वप्निल खोले ,भाऊसाहेब मुळीक ,निलेश उगलमुगले ,आबासाहेब मुखेकर,अरविंद फरताडे ,अमोल ढाकणे ,ईश्वर सानप ,नितीन ढाकणे ,राज नेटके ,अमोल गायकवाड ,वैभव गाडेकर ,दादासाहेब मोरे प्रकाश सव्वाशे ,,अशोक मोरे केशव कदम ,संतोष चव्हाण ,गौरव पाटील, नितीन जायभाय

निलेश भारती .सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यावेळी अध्यक्षांचे मनोगत व्यक्त केले सर्व शिक्षक वृंदांनी आम्हा विद्यार्थ्यांसाठी मोलाचे मार्गदर्शन करून भावी आयुष्याची वाटचाल कशी करावी हे सर्व सांगून कार्यक्रमाची सांगता झाली.



परळी वैजनाथ राज्याचे उप मुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे तसेच राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे एक दिवसाच्या दौऱ्यावर आगमन झाले. त्यावेळी हेलिपॅड वर प्रशासनातर्फे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी त्यांचे स्वागत केले.

# परळी औष्णिक विद्युत केंद्राचा उपमुख्यमंत्र्यांकडून आढावा



प्रतिनिधी @ परळी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज परळी औष्णिक विद्युत केंद्रा अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला. शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीला पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंढे आदी उपस्थित होते.यावेळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सादरीकरणाद्वारे औष्णिक विद्युत केंद्राबाबत माहिती दिली. यामध्ये प्रस्तावित संच क्रमांक-१ ची मंजुरी व उभारणी, सौर ऊर्जा प्रकल्प मान्यता, राखेचे प्रदूषण व उपाययोजना, औष्णिक विद्युत केंद्राच्या विश्रामगृहाचे नुतनीकरण, थर्मल परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे, थर्मल कॉलनी परिसरात वृक्ष लागवड, सौर ऊर्जा प्रकल्प, आदी विषयांबाबत आढावा घेण्यात आला. परळी औष्णिक विद्युत केंद्राबाबत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आपले सहकार्य असेल असे श्री.पवार यांनी सांगितले. यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते.

## पान १ वरून...

### टकरीत दोन काळवीट....

यावेळी पाडळी गावचे सरपंच गहिनीनाथ पाखरे, नवनाथ सानप आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

त्यानंतर सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या संजीविका वन्यजीव रुग्णवाहिकेच्या मदतीने या काळविटाना शिरूर कासार येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात नेऊन त्यावर उपचार केले .तर मृत काळविटाचे शवविच्छेदन पशुधन विकास अधिकारी डॉक्टर नरोटे यांनी केले. पुढील उपचारासाठी जखमी काळवीट सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात दाखल करण्यात आले. आहे.

### इथे बसताना.....

त्यामुळेच आज बीड जिल्हा नियोजन बैठकीमध्ये सत्तेत असलेल्या माजी पालकमंत्री धनंजय मुंडे यांना पालकमंत्र्यांच्या समोर असलेल्या समोरील आमदारांच्या आणि त्या पाठीमागे अधिकाऱ्यांच्या बाकड्यांवर एकट्यांना बसण्याची वेळ आली. याप्रसंगी ज्या वेदना आणि त्रास झाला असेल तो दुर्दैवाने त्यांना व्यक्तही करता येत नाही हीच खरी मोठी राजकीय शोकांतिका म्हणावी लागेल.या परिस्थितीतून लवकरच बदल व्हावा आणि ते पुन्हा एकदा समोरील प्रमुख व्यासपीठावर यावेत अशी संधी निर्माण व्हावी अशीच मुंडे भक्तांची प्रामाणिक अपेक्षा असेल यात शंका नाही.

### बीड मतदारसंघातील ....

जागेची तांत्रिक क्षमता तपासणी करता प्रस्ताव सादर केलेला आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे.

बीड शहरात सेंटर फॉर इनोव्हेशन च्या उभारणीबाबत टाटा टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संमती दर्शवली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.शहरातील विद्यार्थी, विज्ञान व संशोधन प्रेमी तसेच नागरिकांसाठी सायन्स पार्क आणि तारांगण प्रस्तावास मान्यता देण्यात आली.जिल्हा रुग्णालय, बीड येथे शहरी व ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्वाच्या सुविधा करिता भरीव निधीला मान्यता देण्यात आली.बिंदुसरा प्रकल्प तसेच बीड मतदार संघातून जाणार्या बिंदुसरा नदी पात्रात स्वच्छता व सुशोभीकरण कामे होणार आहेत.जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सिंथेटिक ट्रॅक व विविध क्रीडा सुविधा निर्माण करण्याची मागणी केली.बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम करण्यासाठी रोल मॉडेल तयार करण्याचे सुचविले.बीड शहरातील खुले भूखंड व उद्यान विकसित करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाचे डीपी रस्ते निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाच्या चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन करण्यात येणार आहे.बीड मतदार संघातील पर्यटनाचे स्थळ असलेले युवा शांतीवन व सह्याद्री देवराई या ठिकाणी वन विभागामार्फत विविध विकासकामे करण्यात येणार आहेत.

# वैद्यनाथ मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत - ना. पंकजाताई मुंडेंनी केल्या सूचना

## उप मुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला तीर्थक्षेत्र विकास योजनेतील कामांचा आढावा

प्रतिनिधी @ परळी

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत वैद्यनाथ मंदिर परिसरात जी कामे सध्या सुरू आहेत, ती दर्जेदार तर व्हावीतच पण त्याचबरोबर मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व जपले जावे अशी सूचना राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आज परळी दौऱ्यावर होते. ना. पंकजाताई मुंडे हया त्यांच्यासमवेत दौऱ्यात होत्या. सकाळी शहरात आल्यानंतर प्रभू वैद्यनाथाचे त्यांनी दर्शन घेतले. वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या मंदिर परिसरातील तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सुरु असलेल्या कामांची त्यांनी उप मुख्यमंत्र्यासह पाहणी केली. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातंर्गत सुरू असलेल्या विविध विकास कामांची आढावा बैठक अजित पवार यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह येथे झाली, त्यावेळी ना पंकजाताई मुंडे यांनी बैठकीत महत्त्वपूर्ण सूचना केल्या. आ. धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासह सर्व संबंधित वरिष्ठ अधिकारी यावेळी



उपस्थित होते.

पंकजाताई मुंडे पालकमंत्री असताना वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखडयाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. १३३ कोटी रूपये त्यांनी त्यावेळी मंजूर केले होते. नंतर यात वाढ होऊन २८६ कोटीचा आराखडा मंजूर करण्यात आला. या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना सध्या वेग आला आहे. ना. पंकजाताईंनी बैठकीत बोलताना म्हणाल्या, ही कामे दर्जेदार व्हावीत, भक्त निवास, दर्शन मंडप, मंदिर परिसर सुशोभीकरण,यासह भाविक भक्तांना चांगल्या सोयी सुविधा मिळाव्यात, मंदिराचे पौराणिक व प्राचीन महत्व कायम ठेवून विकास कामे व्हावीत याकरिता खबरदारी घ्यावी अशा सूचना यावेळी पंकजाताई मुंडे यांनी या बैठकीत केल्या.



### भाजप कार्यकर्त्यांकडून अजित पवार यांचे स्वागत

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व ना. पंकजाताई मुंडे यांचे सकाळी ८ वा. हेलिकॉप्टरने शक्तीकुंज वसाहत येथील हेलिपॅडवर आगमन झाले. भाजप सह महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे स्वागत केले. भाजपच्या शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, तालुकाध्यक्ष राजेश गिते, बंडू निर्मळ, माजी तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, वैद्यनाथ बॅंकेचे अध्यक्ष विनोद सामत, विजय वाकेकर, संदीप लाहोटी, महादेव इटके, गणेश कराड आदींनी यावेळी त्यांचे स्वागत केले.

## ऑपरेशन सिंदूर नंतर देश हितासाठी एक रुपया देश भक्तांना मागितला !

# बीडच्या मातीतील गुळभिळे दांपत्याने तब्बल एक महिन्याचा पगारच दिला !!

प्रतिनिधी @ बीड

ऑपरेशन सिंदूर नंतर देश संरक्षण आणि देश हितासाठी भारतीय देशभक्तांना किमान एक रुपया पंतप्रधान रिलीफ फंड मध्ये जमा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. याच पार्श्वभूमीवर बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना देशभक्तीसाठी आवाहन केले होते. या आव्हानावर प्रेरित होऊन राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभिले यांनी आपल्या स्वतःच्या पगारासह आपली धर्म पत्नी निता गुळभिळे सहशिक्षिका जिल्हा परिषद या दोघांचाही तब्बल एक महिन्याचा पगार पंतप्रधान रिलीफ फंडसाठी देऊन देशामध्ये एक नवा आदर्श निर्माण करत बीडच्या मातीतील हे सामाजिक दायित्व देखील जगापुढे आणले आहे.

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभिळे आणि त्यांच्या पत्नी नीता गुळभिळे या दोघा आदर्श दांपत्याने आपला एक महिन्याचा पगार पंतप्रधान रिलीफ फंडसाठी देत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून प्रेरणा घेत पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली गुळभिळे दांपत्याने हा निर्णय घेतल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होतं आहे.



मागील आठवड्यात भारत पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या दहशतवादी विरुद्ध भारताने ऑपरेशन सिंदूर राबवून पाकिस्तानला पळता भुई केली. यानंतर सिने अभिनेता अक्षय कुमार याने भारतीय जनतेने देशसेवेप्रति प्रत्येक नागरिकांने एक रुपया पी एम रिलीफ फंडासाठी देण्याचे आवाहन केले होते.

गेल्या अनेक वर्षांपासून पोलीस सेवेत असताना पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभिळे यांनी जिव्हाळा बेघर असो कि जाणीव प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून गोर गरिबांची सेवा केलेली आहे. एड्सग्रस्ताचे विवाह लाववण्यासारखे सामाजिक उपक्रम देखील त्यांनी राबवले आहेत.दरम्यान ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी देशसेवा काय असते याबाबत कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले होते. त्यानुसार प्रेरित होऊन सूर्यकांत गुळभिळे आणि त्यांच्या पत्नी जिल्हा परिषद शिक्षिका नीता गुळभिळे या दांपत्याने आपला एका महिन्याचा पगार पी एम रिलीफ फंडासाठी दिला आहे.

देशसेवेचे एक नवे रूप गुळभिळे दांपत्याने उभे केले..

गुळभिळे दांपत्याने जो निर्णय घेतला आहे त्याचा आदर्श इतर कर्मचाऱ्यांनी घेतल्यास देशसेवेचे एक नवे रूप पहायला मिळेल. गुळभिळे यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून अभिनंदन होतं आहे.

देश सेवेसाठी मिल्ट्री मध्ये ८ नातेवाईक

राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त पोलीस उपनिरीक्षक सूर्यकांत गुळभिळे यांच्या कुटुंबातील तब्बल ८ नातेवाईक देश सेवेसाठी देशाच्या सीमेवर सैनिक म्हणून कार्यरत आहेत.पोलीस खात्यात राहुन सुद्धा सूर्यकांत गुळभिळे यांची देखील समाजसेवेतून देशसेवा सुरू आहे हे विशेष. अनाथ, पीडित, वंचित, उपेक्षित, गरजवंत, बेघर यांच्या सेवेसाठी ते २४ तास तत्पर असतात. पत्नी देखील शिक्षिका असताना सुद्धा गोरगरीब, गरजवंत विद्यार्थ्यांना घडवण्याचे कार्य निस्वार्थ भावनेने करत आहेत. त्यामुळे या दांपत्यांचे कार्य हे माणुसकी कशी असते हे सिद्ध करणारे ठरले आहे. त्यांच्या या निस्वार्थ समाजसेवेमुळेच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्यानंतरही पुनर्जीवन मिळाले. बायपास होऊन देखील ते पुन्हा तेवढ्याच नव्या जोमाने समाज आणि देश सेवेसाठी तत्पर झाले आहेत हेच त्यांच्या या कृतीतून पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

# राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार यांची राजकिशोर मोदी यांच्या घरी सदिच्छा भेट

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

## बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद स्वीकारल्यानंतर अंबाजोगाई शहरात दादांची पहिलीच भेट



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष मा ना अजितदादा पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी सोमवार दि १९ रोजी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत आमदार धनंजय मुंडे, आमदार विक्रम काळे, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, प्रा. नानासाहेब गाठाळ, केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, हारुन इनामदार, ॲड विष्णुपंत सोळंके, प्रा माणिकराव लोमटे, सतीश नाना लोमटे, मनोज लखेरा, संकेत मोदी, सुरेश मोदी, किशोर परदेशी , बबन लोमटे सुनील वाघाळकर, महादेव आदमाणे, अमोल लोमटे, दिनेश भराडीया, यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारल्यापासून अजितदादा यांचे अंबाजोगाई शहरात प्रथमच आगमन होत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांचे भव्य असे स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख म्हणून राजकिशोर मोदी यांच्या निवासस्थानी देखील ही त्यांची पहिलीच भेट असल्याने मोदी परिवाराच्या वतीने देखील उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे उत्स्फूर्त असे स्वागत करण्यात आले.

यावेळी अजितदादा पवार यांनी आगामी काळात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकिसाठी संपूर्ण ताकदीने निवडणुकीच्या तयारीला लागण्याच्या सूचना केल्या. अंबाजोगाई शहरातील नगर परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे जास्तीत जास्त नगरसेवक कसे निवडणूक आणता येतील यासाठी प्रयत्न करण्याचे यावेळी आवाहन केले. त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रमुख म्हणून आमच्याकडून लागेल ते सहकार्य करण्याचे आश्वासन देखील ना अजितदादा पवार यांनी मोदी निवास येथिल भेटीदरम्यान राजकिशोर मोदी यांना दिले.या भेटीत दादांनी बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई शहराचा विकास कसा करता येईल याबाबत सविस्तर चर्चा केली. तसेच यावेळी दादांना भेटायला आलेल्या अभ्यंगतांच्या विकासात्मक निवेदनांचा स्वीकार करत या सर्व निवेदनाबाबत आपण सकारात्मक विचार करू असेही आश्वासन यावेळी अजितदादा पवार यांनी निवेदनकर्त्यांना दिले.



# बीड संग्राह्य असे कॉफी टेबल बुक-अजित पवार

## नियोजन समितीच्या बैठकीत झाले विमोचन

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्याची सचित्र आणि उत्तम अशी मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे पुस्तक कुणालाही आपल्या संग्रही ठेवावे असे वाटेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी केले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांची आमदार धनंजय मुंडे यांची यावेळी उपस्थिती बीड जिल्हा माहिती कार्यालयातर्फे नियोजन निधीतून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत हा विमोचन सोहळा पार पडला.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार संदीप क्षीरसागर, आमदार विजयसिंह पंडित आदींची यावेळी विशेष उपस्थिती होती

# गेवराई नगर परिषदेकडून १८ कोटींच्या विकास कामांचा शुभारंभ

## उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून पी.टी.आर.चे वाटप

प्रतिनिधी @ गेवराई






गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून तब्बल १८ कोटी रुपये किंमतीच्या विविध विकासकामांचा शुभारंभ तसेच अतिक्रमण धारकांना हक्काच्या पी.टी.आर. चे वाटप उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न झाले.कार्यक्रमास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार विजय सिंह पंडित. आमदार सर्वश्री सतीष चव्हाण, विक्रम काळे, माजी आमदार अमरसिंह पंडीत, कल्याण आखाडे, प्रा.सुनील मगरे, राजेश्वर चव्हाण, शंकर देशमुख, स्वप्नील गलधर यांच्यासह अनेक मान्यवर, नगरसेवक, प्रशासनातील अधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमाचा उद्देश शहरी भागात भौतिक सुविधा वाढवणे, अनधिकृत बांधकामांना अधिकृत दर्जा देणे व नागरी विकासाला गती देणे हा आहे. कार्यक्रमादरम्यान अजित पवार यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगत, भविष्यात आणखी निधी देण्याचे संकेत दिले.

या विकास योजनेत रस्ते, नाल्या, पाणीपुरवठा, स्ट्रीट लाईट आणि इतर नागरी सुविधा यांचा समावेश आहे. हा उपक्रम गेवराई शहराच्या विकासासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.१८ कोटी रुपये किंमतीच्या विविध विकास कामांमध्ये शिवाई नगरी येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, अहिल्यानगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, सेवालाल नगर येथे सिंमेट रस्ता व डोम बांधकाम, सावता नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, इस्लामपूरा भागातील कब्रस्थान संरक्षक भिंत बांधकाम, ताकडगाव रोड येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, कृष्णाई नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, पंचायत समितीलगत व्यापारी संकुल बांधकाम, छत्रपती संभाजी महाराज चौक सुशोभिकरण, जुने गेवराई शहर सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, कोरबू मोहोल्ला येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, विरशैव समाज स्मशानभूमीचे बांधकाम, तय्यब नगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, संजयनगर येथे सिंमेट रस्ता व नाली बांधकाम, संघमित्र नगर येथे बौद्ध विहार बांधकाम, वीर लहुजी नगर येथे आरोग्य केंद्र बांधकाम, जलशुद्धीकरण केंद्र येथे एक्सप्रेस फिडरची जोडणी, गेवराई शहर येथे शादीखाना बांधकाम करणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

## सख्या चुलत्यानेच केला पुतणीवर अत्याचार


# आरोपीच्या नैसर्गीक मृत्युपर्यंत आजीवन कारावासाची सुनावली शिक्षा

प्रतिनिधी @ बीड

ता. आष्टी, जि.बीड पिडीत अल्पवयीन मुलीवर (पुतणीवर) बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आष्टी तालुक्यातील रहिवासी असलेला आरोपीस अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ बीड मा. एस.आर पाटील मॅडम यांनी कलम ३७६ (२) (१), ३७६ (२) (प), ३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचारः प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

ऑगस्ट २०२३ मध्ये पिडीतेच्या पोटदुखीच्या आजारावरून डॉक्टराकडे तपासणीसाठी घेउन गेल्यानंतर संबंधीत डॉक्टरांनी पिडीतेस पुढील तपासणीसाठी अहिल्यानगर (अहमदनगर) येथील तज्ञ डॉक्टराकडे पाठविले असता तज्ञ डॉक्टरांच्या तपासणी मधे पिडीता हि ७ महिन्याची गरोदर असल्याचे निर्देशनास आले त्यावरून पिडीतेच्या आईने पिडीता हि १३ वर्षांची अज्ञान बालिका असुन तिचे अज्ञानाचा फायदा घेउन आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला अशा अशयाच्या फिर्यादी दिली. त्यावरून प्रस्तुत प्रकरणातील आरोपी विरूद्ध तोफखाना पो.स्टे अहिल्यानगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला व सदर गुन्हा हा अंभोरा पो.स्टे ता. आष्टी जि. बीड च्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरील गुन्हा पो.स्टे अंभोरा ता. आष्टी यांच्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला. सदर तपासादरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार व वैद्यकीय पुरावा यावरून प्रस्तुत प्रकरणातील अरोपी विरूद्ध सबळ पुरावा आढळल्याने विशेष सत्र न्यायालय बीड येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणाचा तपास सुरवातीला ए.पी.आय श्री बी. सी. गोसावी, ए.पी.आय श्री डी.वी कोळेकर व त्यांनतर श्रीमती सुरेखा. एस. धस, म.स.पो.नि. अ.मा.वा.प्र. कक्ष यांनी केला.सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी पिडीता, फिर्यादी, डॉक्टर, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा येथील तज्ञ व इतर एकुण १८ साक्षीदार तपाण्यात आले. सदर प्रकरणात पिडीतेचा पुरावा त्याचबरोबर पिडीतेबाबतचा वैद्यकीय पुरावा व प्रकरणातील डी.एन.ए. तपासणी अहवाल व इतर साक्षीदार यांचा पुरावा व सहा, सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. एस. आर पाटील मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील आरोपीस कलम ३७६ (२) (ष), ३७६ (२) (प), ३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याबार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा



सुनावली आहे.

सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके व ॲड. अजय दि. राख जिल्हा सरकारी वकिल, बीड यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलिस हवालदार ११४ बी बी. शिंदे तसेच अंभोरा पोलिस स्टेशनच्या महिला पोलिस कर्मचारी एस.आर जेव्हे यांनी सहकार्य केले.



## पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना राज्यभरासाठी एक समान

# 'टाईप प्लॅन' तयार करणार

प्रतिनिधी @ बीड

नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना यापुढे राज्यभरासाठी एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन विकास समितीची बैठक पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई बोलत होत्या. खरीप हंगाम पूर्व आणि जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तसेच जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प असलेले प्रस्तावित विमानतळ, अहमदनगर-बीड-परळी रेल्वेमार्ग, कृषी महाविद्यालय परळी, बिंदुसरा स्वच्छता, जिल्हा क्रीडा संकुल, शासकीय इमारती आदी विविध विषयांचा आढावा यावेळी बैठकीत घेण्यात आला.

यावेळी बैठकीत बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, अनेक ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाला नवीन इमारतींची गरज आहे. यापुढे नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतींचे बांधकाम करत असताना संपूर्ण राज्यभर एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करून इमारती बांधल्या जातील.

बीड, जालन्यात विशेष तरतूद

बीड व जालना जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना बांधण्याकरिता राज्य स्तरावरून निधीची विशेष तरतूद करण्यात येईल असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी सांगितलं. परळी येथे होत असलेल्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावित कामाचा बैठकीत आढावा घेण्यात आला.

# पक्षांसाठी मुठभर चारा, घोटभर पाणी

## किरण शिनगीरे यांनी राबवला उपक्रम

प्रतिनिधी @ आष्टी

सध्या उन्हाळयाच्या झळा दिवसेंदिवस बसू लागल्या असताना चारा, पाण्याविना पक्षांचा चिवचिवाट सुरू आहे. आज चिवचिवाट थांबवण्यासाठी मूठभर चार आणि घोटभर पाणी हा उपक्रम हाती घेऊन आष्टी तालुक्यातील वटनवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते किरण शिनगीरे यांनी आपल्या घरासमोर पक्षांना पाणी आणि चारा यांची सोय करून जनजागृती सुरू केली आहे.

उन्हाळ्याच्या कडाक्यामुळे मानवी जीवनासह प्राणी - पक्षांचेही जगणे कठीण झाले आहे. अशा परिस्थितीत घोटभर पाणी आणि मुठभर चारा हा उपक्रम पक्षांसाठी जीवनदायी ठरत आहे. दोन - तीन वर्षापासून पाऊस चांगला झाला असला तरी यंदाच्या उन्हाळ्यात त्याच्या झळा जाणवू लागल्या असून पक्षी चारा, पाण्यासाठी चिवचिवाट करत असताना नागरिकांनी अंगणात किंवा ओट्यावर मुठभर चारा आणि घोटभर पाणी हा उपक्रम हाती घ्यावा असे आवाहन किरण शिनगीरे यांनी सोशल मीडिया द्वारे केले आहे. नागरिकांनी या उपक्रमात सहभाग घेऊन पक्षांना चारा व पाण्याची सोय करावी असे आवाहन शेवटी किरण शिनगीरे यांनी केले आहे.



# मागणी पेक्षा अधिक खत व बियाणे उपलब्ध करून ठेवा-अजित पवार

प्रतिनिधी @ बीड

खरिप हंगामात खते आणि बियाणे क्षमतेपेक्षा जास्त उपलब्ध राहील याचे नियोजन करा असे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिले. येथील नियोजन समिती सभागृहात खरिप हंगाम २०२५ पूर्वतयारीचा आढावा त्यांनी एका बैठकीत घेतला त्यावेळी ते बोलत होते.यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे आदींची उपस्थिती होती. यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार नमिता मुंदडा, आमदार संदीप क्षीरसागर,आमदार विजयसिंह पंडित आदींची यावेळी विशेष उपस्थिती होती.

जिल्ह्यात बोगस बियाणे मोठ्या प्रमाणावर विकल्याचे प्रकार मागिल काळात घडले तसेच खताबाबतही तीच स्थिती होती याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे आमदार प्रकाश सोळंके, सुरेश धस तसेचआमदार संदीप क्षीरसागर आणि विजयसिंह पंडित यांनी यावेळी सांगितले तर यावर उपायासाठी गुणनियंत्रण पथकाने काम वाढवावे असे निर्देश श्री. पवार यांनी दिले.

गेवराई येथील आमदार विजयसिंह पंडित यांनी खताच्या रॅक परळी वैजनाथ येथे असल्याने खतासाठी जादा पैसे मागितले जातात त्यामुळे जवळच्या जालना येथे खताच्या रॅक ठेवण्याची मागणी केली. यावर श्री पवार यांनी मुंबईत अधिकाऱ्यांनी बैठकीतूनच फोन द्वारे सदर बदल करण्याचे आदेश दिले..खरीप हंगामासाठी तालुका निहाय खताचे नियोजन करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात या हंगामात ४३०० मे.टन युरिया आणि १२५० मे.टन डी ए पी लागेल असा अंदाज आहे. १७ मे २०२५ पर्यंत युरिया ६४६ मीटर आणि डी ए पी ७५७.५ मे.टन असा संकलित करण्यात आलेला आहे अशी माहिती जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिली.जिल्ह्यात कृषी पतपुरवठा स्थितीत सुधारणा होणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना सावकाराकडून पैसे घेण्याची वेळ येऊ नये यासाठी कृषी कर्जातील तांत्रिक अडचणी सोडविण्यावर विचार करण्यात येणार असल्याचीही माहिती उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

अनेकदा दुबार पेरणीची वेळ येते अशी वेळ येऊ नये यासाठी राज्यस्तरावर सर्व शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे काम केले जाणार असल्याचेही श्री. पवार यांनी यावेळी सांगितले.

# एक सुध्दा पात्र व्यक्ती घरकुल लाभा पासुन वंचीत राहता कामा नये!

## घरकुल सर्वेक्षण मध्ये कुचराई केल्यास कार्यवाही होणार
## आमदार राजेश पवार यांचे पंचायत समिती प्रशासनाला निर्देश

**धर्माबाद ( अशोक पडोळे )**

भारतात एकही कुटूब बेघर राहता कामा नये यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात मोठ्या प्रमाणात घरकुलाला मंजुरी देत आहेत. नुकतेच पंतप्रधान आवास योजना टप्पा-२ अंतर्गत ग्रामीण व शहरी भागात घरकुल वंचित कुटूंबाला घरकुल देण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे प्रक्रिया सुरू आहे.हा सर्वेक्षण काटेकोरपणे करण्यात यावे;जेणेकरून कोणताही गरजू नागरिक या योजनेपासून वंचित राहणार नाही.कोणी कर्मचारी या कामात कुचराई करेल तर त्यांच्या विरुद्ध कार्यवाही करण्यात येईल असे निर्देश आ.राजेश पवार यांनी पंचायत समिती प्रशासनाला दिले आहेत.पंतप्रधान आवास योजनेच्या सर्वेक्षणाचा आढावा घेण्यासाठी आ.राजेश पवार यांनी शुक्रवारी दुपारी सव्वा तीन वाजता आयोजित केलेल्या ऑनलाईन बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला माजी जि.प.सदस्या पुनमताई पवार , जिल्हा परिषदेचे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, नायगाव विधानसभा मतदारसंघातील तीनही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी ,ग्रामसेवक आदी कर्मचारी सामिल होते.



बैठकीच्या प्रारंभी पंतप्रधान आवास योजनेच्या या सर्वेक्षणाचा नायगाव ,उमरी, धर्माबाद या तीन तालुक्याचा चालु परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर बैठकीला संबोधित करताना आ.राजेश पवार यांनी सर्वेक्षणामध्ये अधिक गती आणण्याची सूचना केली. पंतप्रधान आवास योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्त्वाकांक्षी योजना असून, या योजनेच्या माध्यमातून बेघरांना तसेच कच्च्या घरात राहणाऱ्या गरजू नागरिकांना पक्क्या घराची सुविधा उपलब्ध होते. त्यामुळे कोणताही गरजू व पात्र नागरिक या सर्वेक्षणातून वंचित राहता कामा नये, या योजनेकरिता अर्ज करण्याची अंतिम तारीख दोन आठवड्यानी वाढली असुन ३१ मे आहे. त्यामुळे राहिलेल्या दिवसांत प्रशासनाने अधिक व्यापक स्तरावर जनजागृती व सर्वेक्षण करावे, असे निर्देशही आ.राजेश पवार यांनी यावेळी दिले. पुढे बोलताना आ.पवार म्हणाले आतापर्यंत घरकुलाचा लाभ भेटला नाही . असे अनेक व्यक्ती कुटूंब कामाच्या शोधात पुणे , मुंबई , हैदराबाद आदी ठिकाणी गेले आहेत .त्या व्यक्तीना ग्रामसेवक सरपंच या दोघांनी सुचना देऊन बोलावून घ्यावे व त्याचे पण गावात राहुन सुध्दा अनेक कुटूंब बेघर व कच्या घरात राहतात त्या पण लाभ भेटला नाही असा कुटूंबाचे घरकुल सर्वेक्षण करून घ्यावे . तारीख वाढली असली तरी प्रत्येक ग्रामसेवक सतर्क राहुन घरकुल सर्वेक्षण करावे .या लाभापासून एकही कुटूंब वंचित राहता कामा नये अशा सुचना देत तीनही तालुक्यातील गटविकास अधिकाऱ्यांना तालुक्यात दररोज किती सर्वेक्षण झाले यांची माहीती कळवावे असे आ.पवार यांनी सागितंले.


# मोरेवाडीत विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज कोसळली

**प्रतिनिधी @ बीड**

मंदिराचे नुकसान, जीवित हानी नाही

अंबाजोगाई शहरासह तालुक्यात ऐन उन्हाळ्यात अवकाळी पावसाने काल आणि आज दिनांक १९ मे सोमवार रोजी सायंकाळी थैमान घातले. असून, अचानक पडलेल्या या पावसामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले. दरम्यान, मुसळधार पावसामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला असून मोरेवाडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज पडून मंदिराचे अंशतः नुकसान झालेले आहे जीवितहनी झालेली नाही. अंबाजोगाई शहरासह तालुक्यात गेल्या

काही दिवसांपासून उष्णतेची तीव्र लाट पसरली आहे. गेल्या आठवड्यात पारा ३९ अंशाच्या वर गेला होता. उन्हामुळे शहरातील नागरिक दुपारी घरीच राहणे पसंत करीत होते. परंतू आज दुपारी मोठ्या प्रमाणात गर्मी होत असल्याने पाऊस येणार असे वाटत होते आणि झालेही तसे. सायंकाळी अवकाळी पावसाने शहरासह तालुक्यात हजेरी लावली. यामुळे



काही काळ जनजीवन विस्कळीत झाले. विजांचा कडकडाट आणि मुसळधार पाऊस यामुळे काही काळ उकाड्यापासून सुटका मिळाली असली तरी परिसरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याची माहिती समोर आली असून मोरेवाडीतील विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर वीज पडून मंदिराचे अवश्यतः नुकसान झाले असून कुठल्याही प्रकारची जीवित हानी झाली नसल्याचे बोलले जात आहे.

# कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये- आ.संदीप क्षीरसागर

## सर्व ग्रामसेवकांनी खबरदारी घेण्याच्या कडक सूचना

**प्रतिनिधी @ बीड**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हेपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत.



ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थींना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्रामसेवकांनी करून द्यावा. एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आवश्यक सुविधा निर्मितीला प्राधान्य- उपमुख्यमंत्री अजित पवार

## आवश्यक मनुष्यबळ, पायभूत सुविधांसाठी लवकरच वैद्यकीय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाची संयुक्त बैठक घेणार

**प्रतिनिधी @ अंबाजोगाई**

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी असलेले एक महत्वाची आरोग्य संस्था आहे. या संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून याठिकाणी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी दिला जाईल. या निधीतून प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक सुविधा निर्मिती करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज येथे दिले.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आयोजित आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, अक्षय मुंदडा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आरोग्य सहसंचालक डॉ. शिल्पा दमकुंडवार, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी. एम. थोरात यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदवीपूर्व विद्यार्थी क्षमता १५० इतकी असून या प्रवेश क्षमतेसाठी



### वैद्यकीय महाविद्यालयाच्या ५० वर्षपूर्ती निमित्त विविध सुविधा निर्मितीला निधी देणार

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) निश्चित केलेल्या नियमानुसार आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच वैद्यकीय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल. तसेच आवश्यक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या निधीतून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार आराखडा तयार करावा. पायभूत सुविधांची निर्मिती करताना उपलब्ध जागेचा पुरेपूर आणि योग्य वापर होण्यासाठी तज्ज्ञ आर्किटेक्टची नेमणूक करावी. महाविद्यालयाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटवावे, तसेच पुन्हा अतिक्रमण होवू नये, यासाठी संपूर्ण परिसराला सुरक्षा भिंत बांधण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा अत्यावश्यक आणि दर्जेदार कामासाठी विनियोग करावा. औषधांच्या बाबतीत कोणत्याही तक्रारी येवू नयेत, याची काळजी घ्यावी. सध्या सुरू असलेली बाह्यरुग्ण विभाग, मुलांचे वसतिगृह आणि मुलींच्या वसतिगृहाचे काम उच्च दर्जाचे होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या शंभर एकर क्षेत्रामध्ये मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करावी, तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारावे. महाविद्यालय व रुग्णालयात, तसेच अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने, वसतिगृहातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी वृक्ष लागवडीसाठी वापरावे. भौगोलिक परिस्थितीचा विचार करून परिसरात रुग्णांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी प्रारंभी महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा, तसेच नव्याने आवश्यक सुविधांची माहिती दिली. उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी आपल्या सूचना मांडल्या.

## ११ जून रोजी पत्रकार संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

# इयत्ता १० वी आणि १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांनी नोंदणी करावी

**प्रतिनिधी @ बीड**

इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ८५% पेक्षा अधिक गुण घेतले आहेत.अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते ११ जून रोजी करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र गुणवंत विद्यार्थ्यांनी ८ जून पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने जिल्हाध्यक्ष अमजद पठाण, शेख ताहेर, अँड.विनायक जाधव आणि शेख आयेशा यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या पुढाकारातून बीड जिल्हा शाखेच्या वतीने इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ८५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले आहेत.अशा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी, पत्रकार, समाजसेवक यांच्या शुभहस्ते सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात येणार आहे. सदरील सत्कार सोहळा बुधवार दिनांक ११ जून रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे.या सत्कारास पात्र असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपले नाव ७० ३० १४ ९३ २२ या व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमोची कॉपी, पासपोर्ट फोटो, मोबाईल नंबर आणि संपर्क पत्ता पाठवून नोंदणी करावी. त्याचबरोबर गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ, पेन आणि सन्मानपत्र स्वीकारण्यासाठी आपल्या मित्रपरिवार आणि पाल्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान पठाण, पत्रकार हल्ला कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, बीड जिल्हा ग्रामीणचे जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव आणि महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, डिजिटल मीडियाची जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे, जिल्हा सचिव शेख वसीम, जिल्हा उपाध्यक्ष शेख आयुब, जिल्हा संघटक रईस खान, पत्रकार हल्ला कृती समिती जिल्हा सचिव शेख अब्दुल, महिला जिल्हा सचिव प्रा. अनुप्रिता मोरे यासह पत्रकार संघ, पत्रकार हल्ला कृती समिती, महिला कार्यकारणी, डिजिटल मीडियाचे सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी केले आहे.

पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया अंतर्गत पत्रकार म्हणून अथवा माध्यमांच्या विविध घटकांमध्ये जे काम करणारे पालक आहेत. त्यांच्या ज्या पाल्यांनी इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेमध्ये ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले आहेत.अशा सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात येणार आहे.

सर्व तालुका स्तरावर गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सत्कार

बीड जिल्ह्यातील गेवराई,वडवणी, माजलगाव, परळी वैजनाथ , अंबाजोगाई, केज, धारूर, पाटोदा, आष्टी, शिरूर कासार या तालुक्यामध्ये तालुकाध्यक्षांच्या संयोजनातून त्या तालुक्यांमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ८५ टक्के पेक्षा जास्त गुण घेतलेले आहेत अशा सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने सन्मानपत्र देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात येणार आहे. यासंदर्भात तालुकास्तरावरून पुरस्काराचे नियोजन, तारीख आणि वेळ निश्चित होणार असल्याचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी स्पष्ट केले आहे.





**प्रतिनिधी @ परळी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांची पाहणीही त्यांनी केली. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आदी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्या हस्ते यावेळी अभिषेक करण्यात आला. मंदिर देवस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्री श्री.पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे तसेच लोकप्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला.



## श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य- उपमुख्यमंत्री अजित पवार

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास कामांचा आढावा

**प्रतिनिधी @ परळी**

श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज सांगितले. विकास आराखड्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही मात्र कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज परळी येथे प्रभु वैद्यनाथचे दर्शन घेतले. त्यानंतर परळी येथील शासकीय विश्रामगृहातील सभागृहात त्यांनी श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंढे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये ९२ कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात २८६.६८ कोटीच्या विविध ९२ कामांना मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.

दर्शन मंडपाचे काम, परिसर सुधारणा, मंदिरा भोवती दगडी फरशी, वास्तुशिल्प प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युतीकरण, सौर दिवे बसविणे, उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंतीचे बांधकाम, वाहनतळ यासह सुरू असलेल्या विकास कामांबाबत मुख्य वास्तुविशारद कृष्णकुमार बांगड यांनी माहिती दिली.उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ हे बारा ज्योर्तिलिंगापैकी एक आहे. प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विकास आराखड्यातील कामेही दर्जेदार होणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत प्रत्येकाने बारकाईने लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिर परिसरातील स्वच्छता, निटनेटकेपणा, सर्व सोई सुविधांयुक्त दर्शन मंडप, तसेच तीर्थक्षेत्र बालाजी, शिर्डी तसेच पंढरपूरच्या धर्तीवर भविष्यात भाविकांना सर्व सोईसुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जीव गेला तरी बेहत्तर, पण उड्डानपूल करून घेणारचं!- किशनराव भोसले

## उड्डानपूल संघर्ष समितीचा सामूहिक निर्धार : तालुक्यातील नागरिक एकवटले

गंगाखेड (प्रतिनिधी)

शहरातील वाहतुक कोंडी हा मोठा चिंतेचा विषय आहे. त्याचा फटाका सर्वांनाचा बसतो. अबालवृध्द, जेष्ठ नागरिक, विद्यार्थी, महिलांसह अनेक घटकांना वाहतुक कोडींचा सामना करावा लागतो. त्यात रेल्वे फाटक बंद होणे, ही मोठी डोकेदुखी आहे. परिणामी, शहराच्या चौफेर प्रत्येक रस्त्यावर वाहानांच्या लांबच लांब रांगा लागतात. दररोज होणाऱ्या या त्रासाला शहरवासीयांसह तालुक्यातील जनता आणि वाहनधारक वैतागले आहेत. त्यामुळे स्थानिक आमदार डॉ.रत्नाकर गुट्टे यांनी केंद्रात पाठपुरावा केला होता. अखेर, त्या पाठपुराव्यास चांगले यश आले असून शहरात भव्य उड्डानपूल मंजूर झाला आहे. परंतु, त्या प्रस्तावित उड्डानपूलास काही विकास विरोधी मंडळींनी विरोध केला आहे. त्यांच्याकडून जनतेची सातत्याने दिशाभूल केली जात आहे. मात्र, आम्ही सुध्दा त्यांचे बाप आहोत. त्यांच्या नाकावर टिच्चून उड्डानपूल करून घेऊ. त्यात जीव गेला तरी बेहत्तर, पण उड्डानपूल करून घेणारचं, असा निर्धार उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीच्या वतीने माजी जिल्हा परिषद सदस्य किशनराव भोसले यांनी केला.



शहरातील प्रस्तावित उड्डानपूलाच्या समर्थनार्थ आयोजित भव्य मोर्चास संबोधित करताना ते बोलत होते. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रल्हाद मुरकुटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव भोसले, जिल्हाध्यक्ष संदीप आळनुरे, इक्बाल चाऊस, माजी नगरसेवक नंदकुमार पटेल, जेष्ठ व्यापारी सुभाष नळदकर, गंगाधरराव पवार, मनोज मुरकुटे, तुकाराम तांदळे, बालाजी मुंडे यांच्यासह अनेकांनी मनोगते व्यक्त करून सर्वसामान्य जनतेच्या भावना मांडल्या. शेवटी, स्थानिक तहसीलदार उषाकिरण शृंगारे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उड्डानपूलाचे समर्थन करणारे लेखी निवेदन देण्यात आले. तत्पूर्वी, दिलकश चौक ते तहसील कार्यालय असा भव्य मोर्चा काढण्यात आला. त्यामध्ये शहरासह तालुक्यातील हजारो नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी 'अरे कोण म्हणतंय होणार नाही, केल्याशिवाय राहाणार नाही!', 'गुट्टे साहाब तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं!' यासह विविध घोषणांनी सगळा परिसर अगदी दणाणून गेला होता.

२०२४ साली मार्च महिन्यात झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात रेल्वे सुरक्षा अंतर्गत शहरातील तहसील कार्यालयाच्या जवळ कोद्री-अकोली रोडवर उड्डाणपुल मंजुर झाला आहे. विशेष म्हणजे या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची निविदा सुध्दा प्रसिध्द झाली आहे. परंतु, काही राजकीय लोकांनी विकासात आडथळा आणण्यासाठी या कामात तांत्रिक अडचणी निर्माण केल्या आहेत. त्यामुळे विकासाला प्राधान्य देत आम्ही शहरवासीय व तालुक्यातील सर्वसामान्य जनता आणि वाहनधारकांच्या वतीने उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीची स्थापना केली आहे. त्या माध्यमातून आमचा उड्डानपूलास जाहीर पाठींबा आहे. शहरातील रेल्वे गेटच्या दक्षिणेच्या बाजुस गंगाखेड शहराचा जवळपास ४० टक्के भाग येतो. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, दुय्यम निबंधक कार्यालय, न्यायालय इमारत, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच अनेक शाळा व महाविद्यालय आहेत. परिणामी, प्रस्तावित उड्डानपूल होणे अत्यंत गरजेचे आहे, असेही त्या लेखी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

त्याचबरोबर शहरातील प्राध्यापक कॉलनी, भंडारी कॉलनी, अरुणोदय कॉलनी, ममता कॉलनी, महात्मा फुले नगर, तुळजाभवानी नगर, राजीव गांधी नगर, बंजारा कॉलनी, जनाबाई नगर, व्यंकटेश नगर, अजिंठा नगर, गौतम नगर, मन्नाथ नगर, कृष्णा नगर, माणिक नगर, माऊली नगर, यज्ञभुमी यासह बालाघाटच्या डोंगर रांगेतील किमान ५० ते ६० गावातील नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. परिणामी, रेल्वे फाटकाच्या खालील भागांमध्ये खासगी व शासकीय दवाखाने आहेत. अनेक वेळेला या फाटकामुळे रूग्णांना प्राण गमवावा लागला आहे. तसेच गरोदर महिला व शालेय विद्यार्थ्यांचेही प्रचंड गैरसोय होत आहे. उड्डाणपूल नसल्यामुळे शहरात सर्वत्र वाहतूक कोंडी होते. वाहानांच्या लांबच लांब रांगा लागतात. एवढेच नाही, तर दिवसातून ३५ ते ४० वेळा रेल्वे गेट बंद होते. त्यामुळे सर्व नागरिकांसह वाहनधारकांची मोठी अडचण होते. त्यामुळे उड्डाणपूल बांधणे शहर व तालुक्यातील जनतेच्या सुखकर दळणवळणासाठी तसेच वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. म्हणूनच सुखकर व आनंददायी प्रवास, शहराचे भविष्य आणि गतिमान दळणवळण यासाठी संबंधित उड्डानपूलाचे बांधकाम त्वरीत सुरू करावे, अशीही विनंती त्या लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.

दरम्यान, शहरवासीय व तालुक्यातील जनता आणि वाहनधारकांच्या लोकभावनेचा आदर करून तहसील कार्यालय जवळच्या प्रस्तावित उड्डानपूलाचे बांधकाम त्वरीत सुरू करून सर्व नागरिकांना न्याय देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा. अन्यथा उड्डानपूल निर्माण संघर्ष समितीच्या वतीने भविष्यात तीव्र आंदोलन उभारले जाईल. गरज पडली तर, मुंबईच्या आझाद मैदानावर सुध्दा उपोषण करू. पण, उड्डानपूलाच्या बाबतीत कणभर सुध्दा मागे हटणार नाही, इशाही गंभीर इशारा त्या लेखी निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी उड्डाणपूल निर्माण संघर्ष समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी तसेच शहर व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्नेह व मातोश्री वृद्धाश्रमात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



परभणी : तालुक्यातील असोला येथील स्नेह व मातोश्री वृद्धाश्रमात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. यात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांच्या संकल्पनेतून, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राहुल गिते, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रावजी सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र पिंगळी अंतर्गत असोला येथील स्नेह ज्येष्ठ नागरिक महिला वृद्धाश्रम व मातोश्री वृद्धाश्र मातील सर्व ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी वैद्यकीय अधिकारी डॉ. अर्चना भुसेवाड, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सतिश चव्हाण, डॉ. मनिषा माने, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी चौधरी व टीम हिंद लॅब, आरोग्य सेवक श्री गिराम, आरोग्य सेविका प्रिया ढेरे यांच्या पथकाने केली. यावेळी सर्वांची रक्त तपासणी, उच्च रक्तदाब, मधुमेह व संशयित कॅन्सरबाबत तपासणी केली. रक्त तपासणी मध्ये उलल, ङर्षी,घर्षी, ढॠढ, ङखझखऊ झठजॠखङए, क्लर१ल, डी लरश्रलळीी व कॅन्सर मार्कर बाबत ाराश्रिश घेतले. यामध्ये एकूण ३४ ज्येष्ठ नागरिकांची तपासणी करण्यात आली. शिबीर यशस्वीपणे राबविण्यासाठी तालुका आरोग्य सहाय्यक श्री जी.एल.शिंदे , स्नेह जेष्ठ नागरीक वृद्धाश्रम येथील संचालिका सौ. सुनिता अहिरे, डॉ. यंबल , श्रीमती लिला पाठक, स्टाफ कर्मचारी व मातोश्री वृद्धाश्रमाचे येथील संचालक श्री गोविंदराव जावळे, श्री व्यंकटराव रवंदळे यांनी सहकार्य केले.

# राज्य शासनाचा १०० दिवसांचा कृती आराखडा उपक्रम

## परभणी उपविभागीय अधिकारी कार्यालयाचा विभागात तृतीय क्रमांक

योग्य नियोजन व कर्मचा-यांच्या परिश्रमामुळे मिळाले यश - उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे

परभणी (प्रतिनिधी)

राज्य शासन व भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या कार्यालयीन मुल्यमापन १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत परभणी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने छत्रपती संभाजीनगर विभागातून तृतीय क्रमांक पटकावला आहे. या मोहिमे अंतर्गत शासकीय कार्यालयांचे कामकाज, कार्यक्षमता, पारदर्शकता, जनतेशी संवाद साधणे, नागरिकांना वेळेवर सेवा देणे आदी विविध घटकांचा आधारित मूल्यांकन करण्यात आले.



उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा घडवून आणली आहे. योग्य नियोजन कर्मचा-यांचे परिश्रम यामुळेच हे यश मिळाल्याचे उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी सांगितले.

राज्यभरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे मुल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाच्यावतीने १०० दिवसांचा कृती आराखडा हा उपक्रम राबविण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालयापैकी सर्वोत्तम कमगिरी करणा-या तीन उपविभागीय अधिकारी कार्यालयाची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये अंतिम परभणी उपविभागीय अधिकारी कार्यालयाने तृतीय क्रमांक पटकावला आहे. ई-प्रशासन, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छता, अनावश्यक कार्यालयीन कागदपत्रांची विल्हेवाट, कार्यालयीन सोयी व सुविधा, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि आधुनिक सार्वजनिक तक्रार निवारण प्रणाली यांसारख्या अनेक क्षेत्रांमध्ये सुधारणा केल्याने परभणी उपविभागीय अधिकारी कार्यालय यांना हे यश प्राप्त झाले आहे.

या यशाचे श्रेय परभणी उपविभागीय व तहसिल कार्यालयातील प्रत्येक अधिकारी आणि कर्मचा-यांचे आहे. वेळोवेळी जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शन व तहसिलदार परभणी यांचे सहकार्य लाभले आहे. लोकाभिमुख, गतिमान, पारदर्शक प्रशासन तयार करण्यासाठी त्या १०० दिवसांमध्ये विशेष प्रयत्न करण्यात आले. यापुढेही असेच काम अविरत सुरु राहील. नागरिकांना मिळणा-या शासकीय सेवांची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, परभणी सदैव प्रयत्नशील राहील, असे उपविभागीय अधिकारी दत्तु शेवाळे यांनी सांगीतले.

# शहीद जवान वनंजे यांच्या कुटुंबाला गायरान जमिनीचा पट्टा मिळावा : पीपल्स रिपब्लिकन पार्टीची पालकमंत्र्यांकडे मागणी



देगलूर (प्रतिनिधी)

जम्मू-काश्मीरमध्ये देशसेवेच्या कार्यात वीरमरण आलेल्या शहीद जवान सचिन यादवराव वनंजे यांच्या देगलूर येथील घरी राज्याचे अपारंपरिक उर्जा, दुग्धविकास व ओबीसी कल्याण मंत्री आणि नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अतुल सावे यांनी सोमवारी (दि.१९ मे) दुपारी भेट देत त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष सतीश पांडवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने पालकमंत्र्यांना निवेदन सादर करत शहीद जवानाच्या कुटुंबासाठी शासकीय गायरान जमिनीचा पट्टा आई-वडिलांच्या नावे देण्यात यावा, अशी आग्रही मागणी केली.सदर निवेदनात शहीद जवानाचा कुटुंब आर्थिकदृष्ट्या अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत असून, कमावता व्यक्ती गमावल्यामुळे आई-वडिलांच्या उदरनिर्वाहासाठी शासनाने भक्कम आधार द्यावा, अशी विनंती करण्यात आली. तसेच, देगलूर शहरात शहीद जवानाचे स्मरणात राहील असे भव्य स्मारक उभारावे, कुटुंबातील सदस्याला शासकीय नोकरीत सामावून घ्यावे आणि पक्के घर उभारून द्यावे, अशा विविध मागण्यांचाही समावेश आहे.

या भेटीदरम्यान पालकमंत्री अतुल सावे यांनी आपल्या मंत्रीपदाचा एक महिन्याचा पगार शहीद जवानाची पत्नी माधुरी सचिन वनंजे यांना सुपूर्त केला. शासन कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली कुटुंबाला सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.या वेळी भाजपचे संघटन मंत्री संजय कौडगे, जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, माजी सभापती माधवराव मिळाले, शिवाजीराव देशमुख, ॲड. प्रितम देशमुख, शंकरराव कंतेवार, अनिल पाटील, प्रशांत दासरवाड, सुरेश मिसाळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक अभिनाश कुमार, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, गटविकास अधिकारी शेखर देशमुख, मुख्याधिकारी नीलम कांबळे यांच्यासह विविध पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पांगरा येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने युवकाचा मृत्यू

## ग्रामस्थावर पसरली एकच शोककळा



पूर्णा (प्रतिनिधी)

तालूक्यातील पांगरा लासीना येथील युवक शेतकरी रामेश्वर गंगाधर ढोणे (वय ३४)यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने रविवारी रात्री दु:खद मृत्यू झाला.अतिशय मनमिळाऊ व्यक्तीमत्व वृत्ती असी स्व.रामेश्वर यांची ख्याती होती.त्याच्या अकाली जाण्याने पांगरा ग्रामस्थावर एकच शोककळा पसरली असून सोमवारी सकाळी १० वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात आई, भाऊ,भावजय,चुलता,चुलती,पत्नी, दोन छोटी मुले असा परिवार आहे.

# राज्यात बनावट दारूविक्री जोमात

गडब/सुरेश म्हात्रे

महाराष्ट्रात एकीकडे गुह्यांमध्ये वाढ होत असताना दुसरीकडे बनावट मध्य विक्री आणि वाहतुकीच्या गुह्यांमध्येही वाढ झाली आहे. राज्य सरकारच्या १०० दिवसांच्या कृती कार्यक्रमाच्या अहवालाच्या माहितीनुसार बनावट मद्य विक्रीच्या गुह्यांमध्ये तब्बल ३७.४९ टक्क्यांनी वाढ झाल्याची धक्कादायक माहिती पुढे आली आहे. या व्यवसायात गुंतलेले ७३० सराईत गुन्हेगार सापडले आहेत.राज्य सरकारच्या महसुलाचा कणा समजल्या जाणाऱ्या अबकारी शुल्क विभागाने १०० दिवसांमध्ये कोणती कामे केली त्याचा सद्यस्थितीचा अहवाल सादर केला आहे. या कृती आराखड्यामध्ये राज्यातील अवैध मद्य धंद्यावरील कारवाईत वाढ करण्याचे उद्दिष्ट

बनावट दारू विक्री गुह्यांमध्ये ३७ टक्के वाढ टँकरवर डिजिटल लॉकर राज्यात मद्याकाची अवैधरीत्या मोठ्या प्रमाणावर वाहतूक आणि चोरीही होते. एखाद्या टँकरमधून मद्यार्क नेताना मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटना होतात. त्यामुळे मद्यार्क आणि महा वाहतूक करणाऱ्या वाहनांवर डिजिटल लॉक किंवा ई-लॉक बसवण्याचे आतापासून सक्तीचे केले आहे. यामुळे टँकरमधून मद्यार्क किंवा ट्रकमधून दारूची चोरी होणार नाही. दिले होते. ही कारवाई करण्यास या विभागाला यश आले आहे. १०० दिवसांत १०० अड्डे बंद हातभट्टी गावठी दारू निर्मिती आणि विक्री हा व्यवसाय पूर्णपणे बेकायदा असून यामुळे नागरिकांच्या जिवाला आणि आरोग्याला धोका निर्माण होतो. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाने १०० दिवसांत हातभट्टीचे १०० आहे बंद करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. त्यानुसार या कालावधीत ११२ हातभट्ट्या आणि १८१ दारूचे गुत्ते बंद करण्यात आले. विना परवाना मद्य व्यवसाय करणे गुन्हा ठरवण्यात आला आहे. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

अवैध मद्य विक्री करणाऱ्यांच्या विरोधात १ जानेवारी ते १५ एप्रिल या काळात राबवलेल्या कारवाईत तब्बल २१ हजार ११८ गुन्हे दाखल करण्यात आले. तर मागील वर्षीच्या तुलनेत अवैध दा मद्य विक्रीच्या गुह्यात ३७.४९ टक्के वाढ झाल्याचे आढळून आले.

# बोगस खत-बियाण्यावर कठोर कार्यवाही करा-कलंबरकर

### लिंकिंग व लुट थांबवण्यासाठी प्रभावी यंत्रणा राबवा

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

पेरणीपूर्व व पेरणी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना लागत असलेल्या खत बियाण्यांची गरज लक्षात घेवून,खत बियाणे विक्रेत्यांकडून बाजारात मोठ्या प्रमाणात अप्रमाणित/बोगस खत-बियाणे आणले जाते. यामुळे उगवण होत नाही,उत्पन्न कमी होते.यापूर्वीही बाजारात बोगस/अप्रमाणित खत-बियाणे येऊनही कृषी कार्यालय त्यांच्याकडे दुर्लक्ष करते,त्यांच्यावर कार्यवाही होत नाही.अशी शेतकऱ्यांची भावना आहे.सरकारकडून सांगितले जाते की, बोगस/खत बियाण्यावर कठोर कार्यवाही करू पण कृषी कार्यालय कार्यवाहीकडे दुर्लक्ष करतंय.हे सर्व लक्षात घेऊन बाजारात येणारे बोगस/अप्रमाणित खत-बियाण्यावर कठोर कार्यवाही झाली पाहिजे,अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी कृषी कार्यालयाकडे केली आहे.



शेतकऱ्यांना खत/बियाणे देतांना लिंकिंग मोठ्या प्रमाणात केली जाते. हे घेतल्याशिवाय हे मिळत नाही. किंवा हे यवढे घ्या हे यवढे देतो. मोठ्या प्रमाणात चालते याकडे कृषी कार्यालय दुर्लक्ष करतंय.त्यासोबत कृत्रिम टंचाई निर्माण करून चढ्या दराने खत बियाण्यांची विक्री केली जाते.यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक नेमले पाहिजेत.भरारी पथकाकडून देखील नियंत्रण ठेवले जात नाही.यामुळे कृषी कार्यालयावर देखील प्रश्नचिन्ह उभा राहतोय.याकडे उच्च अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन भरारी पथकावर देखील कार्यवाही केली पाहिजे तर प्रभावीपणे काम होईल.शेतकऱ्यांना खत बियाणे विक्रेत्यांकडील साठ्याची माहिती मिळाली पाहिजे.

कृषी कार्यालयाने केवळ कागदी कार्य न दाखवता, शेतकऱ्यांची होणारी लिंकिंग, लूट आणि बोगस बियाण्याची फसवणूक थांबवणारी यंत्रणा प्रभावीपणे राबवावी अशी मागणी शिवशंकर पाटील कलंबरकर यांनी केली, यावेळी दिनेश पाटील केरूरकर उपस्थित होते.

# पालकमंत्री अजितदादांचा राजीनामा मागणा-या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले

## ही टगेगिरी सहन करणार नाही - डॉ. गणेश ढवळे

प्रतिनिधी @ बीड

बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ ठरलेले बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी बीडच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजितदादा बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले.



टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही - डॉ.गणेश ढवळे

आज दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे. तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.

# कुठल्याही क्षेत्रात नेहमी अपडेट असावे - आयपीएस अधिकारी कमलेश मीना

प्रतिनिधी @ केज

कुठल्याही क्षेत्रात नेहमी अपडेट राहणे गरजेचे असून री लर्निंग आणि अनलर्निंग हा एक शिकण्याचाच भाग असल्याचे प्रतिपादन आयपीएस अधिकारी कमलेश मीना यांनी व्यक्त केले.ते केज तालुका आयएमएच्या मार्गदर्शन शिबिरामध्ये बोलत होते.केजतालुका आयएमए च्या वतीने उपजिल्हा रुग्णालयात दि.१६ मे रोजी रात्री आठ वाजता मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.यावेळी आयपीएस अधिकारी कमलेश मीना यांच्या हस्ते सदरील शिबिराचे उद्घाटन करण्यात आले तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मेंदूविकार तज्ञ डॉ.अंकुश मैंदाड यांची उपस्थिती होती.यावेळी कमलेश मीना यांनी क्षेत्र कुठलेही असले तरी नेहमी अपडेट असावे आणि शिकण्याची प्रक्रिया ही सुरूच राहिली पाहिजे असे मत व्यक्त केले.तर मेंदू




विकार तज्ञ डॉ.अंकुश मैंदाड यांनी लहान मुलांच्या मेंदू विकारावर सखोल मार्गदर्शन करत लहान मुलांना येणाऱ्या झटक्यांचे निदान कसे करावे याबद्दलउपस्थित डॉक्टर्सना मार्गदर्शन केले.तर आयएमएचे केज तालुका अध्यक्ष डॉ.दिनकर राऊत यांनी लहान मुलांच्या खोकल्याच्या समस्या, निदान,उपचार आणि याबाबत पालकांची भूमिका काय असावी याबद्दल मार्गदर्शन केले. सदरील कार्यक्रमासाठी आयएमएचे सचिव डॉ. भाऊसाहेब चाळक, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष डॉ.वसुदेव नेहरकर,सचिव डॉ. उमाकांतमुंडे,उपजिल्हा रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन राऊत यांच्यासह तालुक्यातील डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.दरम्यान केज तालुका आयएमए चेअध्यक्षपद डॉ.दिनकर राऊत यांच्याकडे आल्या पासून मागच्या काही महिन्यांमध्ये सातत्याने डॉक्टरसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात येत असून याचा फायदाही डॉक्टर्सना उपचार करताना होताना दिसत आहे.

# अध्यात्म क्षेत्राचा आशीर्वाद असलेले भीमराव धोंडे साहेब

प्रतिनिधी @ आष्टी

मनुष्य जीवन हे अध्यात्माशी जोडलेले आहे. याची पूर्ण जाणीव ठेवून राजकीय क्षेत्रात आयुष्य समर्पण करताना सामाजिक बांधिलकीचा भाव मनी ठेवून अध्यात्मक क्षेत्राशी सातत्याने निगडित राहिलेले माजी आ.भीमराव धोंडे साहेब यांना विविध धार्मिक स्थळ आणि मठ महाराज आणि धार्मिक क्षेत्रातील मान्यवर गुनी जणांचा सातत्याने आशीर्वाद राहिला आहे.

महाराष्ट्रातील तमाम लाखो वारकऱ्यांचे दैवत असलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर तर धोंडे साहेबांचा एक वारकरी म्हणून असलेला विनम्र भाव सर्वश्रुत आहे. कुठल्याही शहर, गाव आणि विविध ठिकाणी भीमराव धोंडे साहेब जेव्हा जातात तेव्हा तेथील धार्मिक स्थळांना आवर्जून नतमस्तक होत आशीर्वाद घेण्याची त्यांची पूर्वापार परिवाराची परंपरा आहे. आष्टी - पाटोदा - शिरूर मतदार संघाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी माणिकदौंडी (ता. पाथर्डी) येथील धर्माचार्य ह. भ. प. आदिनाथ महाराज आंधळे यांच्या मठात सदिच्छा भेट दिली. यावेळी गडाच्यावतीने त्यांना स्नेहभोजन म्हणून आमरसाचे जेवण आग्रहाने करण्यात आले. धोंडे साहेबांनी ही गडाने केलेला स्नेहभोजनाचा आणि आमरसाचा आग्रह मोडला नाही. धोंडे साहेब अगदी सामान्य माणूस आणि वारकऱ्याप्रमाणे बसून त्यांनी हा प्रसाद म्हणून अत्यंत पवित्र मनाने तो स्वीकारला. महंत ह. भ. प. आदिनाथ महाराज आंधळे यांच्या आशीर्वादाला ते पात्र झाले. यावेळी समवेत जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे होते. एकूणच, सदैव धार्मिक क्षेत्राशी निगडित राहून राजकीय पदांचा तसेच आर्थिक आणि विविध डामडौल न करता एक सामान्य जीवन जगणारे भीमराव धोंडे साहेब अशा विविध प्रसंगांच्या माध्यमातून लोकप्रियतेच्या सातत्याने शिखरावर राहिले! हा ४० वर्षाचा प्रामाणिकपणाचा इतिहास कायम जपण्यात ते आजही यशस्वी राहिले आहेत.

अत्यंत कठीण परिस्थितीतून लहानाचे मोठे झालेले धोंडे साहेब प्रचंड कष्ट, जिद्द, आत्मविश्वास आणि सामाजिक बांधिलकीचा भाव मनात असल्याने एवढ्या मोठ्या जनसेवेचे नायक ठरले आहेत. बँका, कारखाने, शिक्षण संस्था, सहकारी संस्था, व्यायाम शाळा अशा विविध माध्यमातून रोजगार देणारे ते खऱ्या अर्थाने लोकनायक ठरले आहेत.

# सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार समीर शेख यांच्या भाचीचा विवाह सोहळा थाटात सपन्न

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्याच्या कानकोपऱ्यात, प्रशासकीय विभागात, सामाजिक, राजकीय आणि पत्रकारिता क्षेत्रात व्यापक जनसंपर्क असलेले सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार समीर शेख यांच्या भाचीचा विवाह रोहीदास मंगल कार्यालय, पाटोदा येथे संपन्न झाला. याप्रसंगी विविध क्षेत्रातील मित्र परिवार, स्नेही मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.



या शुभप्रसंगी पाटोदा मा. नगराध्यक्ष आदम सय्यद, नगरसेवक आसिफ सौदागर, नगरसेवक श्रीहरी गीते, नगरसेवक नय्युम पठाण, सरपंच दत्तात्रय खोटे, मा. सरपंच विठ्ठल राख, शामीर भाई सय्यद, ह. भ. प. विजय महाराज राजपुरे, ह. भ. प. अशोक महाराज काकडे, विजय मरकड, उपसरपंच शेषराव भोसले, गणेश खिलारे, जयराम झिंजुर्के, कल्याण राऊत, जितेंद्र भोसले, धांडे सर, विशाल अर्सुळ, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, पाटोदा तालुका मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सोमनाथ कोल्हे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष अब्दुल कादर मकराणी, तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षकेत्तर संघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राजूभाई पठाण, पाटोदा तालुका परिषदेचे उपाध्यक्ष जावेद शेख, पत्रकार पोपट कोल्हे, ज्येष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल, पत्रकार अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, मारुती संत्रे, शेख महेशर, राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड, रामकिसन गिते सर, पत्रकार विजय जाधव, सतीश गर्जे, सचिन शिंदे, सज्जाद, अजीज भाई, सय्यद, सय्यद मिस्तरी, छगन भगत, सुनील सानप, शकील शेख, बशीर भाई शेख, अन्सार शेख, युनुस शेख, इस्राईल शेख, सद्दाम शेख, नवाज मुलाणी, आयुब पठाण, आदी मान्यवर यांनी उपस्थित राहून वधू - वराला शुभेच्छा दिल्या. यावेळी समीर शेख यांनी मामा या नात्याने दोन्ही परिवाराच्या वतीने सर्वांचे आभार मानले.

# खा.बजरंग सोनवणेंनी मांडल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

## पीक कर्जाची मर्यादा वाढविण्याची बैठकीत मागणी,जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खा.सोनवणे बनले शेतकऱ्यांचा आवाज

प्रतिनिधी @ केज

बीड जिल्ह्यातील बहूतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभेच असते.अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते.आता पर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखा पर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ती ५ लाखा पर्यंत करावी अशीमागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली.

जिल्हा नियोजन समिती ची बैठक दि.१९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली.यावेळी पालकमंत्री ना.अजित पवार,मंत्री ना.पंकजा ताई मुंडे,आ.प्रकाश सोळंके,आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे,आ. संदीप क्षीरसागर,आ. विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,मुख्यकार्यकारी अधिकारी आदित्य जीवने,अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना खा. बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे.परंतु मध्यल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामा सोबत विद्यूत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते.विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीडपर्यंत येऊ शकलेली नाही.दरम्यान,रेल्वे



विभागातीलओव्हरब्रिज,अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात.त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल,येणाऱ्याकाळात बीडला रेल्वे येईलआणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल असेही खा.सोनवणे म्हणाले.

खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार

अहिल्यानगर-बीड- परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे.आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पा साठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा,अशी महत्वपुर्ण मागणीही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली.यावेळी उप मुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली.

झेडपीच्या अतिरिक्त कारभाराच्या विषयावर चर्चा

जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्तकामकाजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळ पास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यां कडे असलेला पदभार काढून त्यांना मुळ ठिकाणी पाठवावे अशी भुमिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू असे सांगितले.

बोगस पिकविम्यावरही उठवला आवाज

बीड जिल्ह्यात मागील काळात बोगस पीक विमा भरून परळी भागातील लोकांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

# महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथे तीस वर्षांनंतर माजी विद्यार्थी व गुरुजनांची भेट

प्रतिनिधी @ केज



केज तालुक्यातील बनसारोळा येथील बनेश्वर शिक्षण संस्था बनसारोळा संचलित, महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथे दि.१५ मे २०२५ रोजी १९९५ च्या दहावीच्या बॅचचा गुरुजनांचा सन्मान व विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न झाला.पहिल्या सत्रात मान्यवरांचे वाजतगाजत मिरवणूक काढून मंचाकडे आगमन झाले.दिवंगत गुरुजनांच्या बॅनर वरील फोटोस पुष्पमालाअर्पण करून तसेच कै. नारायण दादा यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.सर्व गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमात महाराष्ट्र विद्यालयातून दहावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून बनेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भागवतराव गोरे व युवराज काकडे हे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.अरविंद शिंदे सर यांनी केले.या कार्यक्रमात श्री. अण्णासाहेब शिंदे, अड.राजेंद्रप्रसाद धायगुडे,डॉ.सचिन पवार,श्रीमती वर्षा जोगदंड यांनी मनोगत व्यक्त केले.गुरुजनां पैकी सर्वश्री.सय्यद सर,काळे सर,धावरे सर यांनी मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र जी काळे यांनी केला.या वेळी सर्व श्री.सारणीकर सर,काळेसर,तांबारेसर, ढगारे सर,धावरे सर, नाना गुरुजी,गरड सर, चाटे सर,रानमारे सर, हंडिबाग सर,काकडे सर,तांबोळी सर,जाधव सर,पवार सर,ठोंबरे बापू,काकडे मामा, खोडसे मामी हे गुरुजन वर्ग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक पालकर सर,मुख्याध्यापक रंगनाथ काकडे सर व त्याचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी दहावी च्या १९९५ व्या बॅचच्या एकूण ८५ मुला-मुलींनी सहभाग नोंदवला.या कार्यक्रमाचेसूत्रसंचालन प्रोफेसर डॉ.मोहन बंडे व आभार प्रा.शंकर पवार यांनी मानले.या प्रसंगी सर्व उपस्थितांना स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते.

दुसऱ्यासत्रात प्रत्येकांनी आपापले मनोगत व्यक्त करून ओळख करून दिली.त्यानंतर मनोरंजन म्हणून संगीत खुर्ची, खो-खो अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी अरविंद शिंदे, मोहन बंडे,कैलास गोरे निळकंठ काकडे,शंकर पवार,सचिन गोरे, निजाम शेख,पदमाकर जाधव,लक्ष्मण गोरे, सलोकता काळे,अर्चना गोरे,वैशाली खोडसे व गेट-टुगेदर ग्रुपच्या सर्व सदस्यांनी तसेचमहाराष्ट्र विद्यालय बनसारोळा शाळेचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# आ.सुरेश धस यांच्या पुढाकाराने शहादेव नरवडे यांच्यावर मुंबई येथे शस्त्रक्रिया

## ६ लक्ष रुपयांपर्यंतची मोफत शस्त्रक्रिया ; नरवडे कुटुंबियांनी मानले आ.धसांचे आभार

प्रतिनिधी @ आष्टी

आष्टी मतदारसंघाचे लोकनेते आमदार सुरेश धस यांची मतदार संघामध्ये निरंतर रुग्णसेवा सुरू असून त्यांनी आत्तापर्यंत शिक्षण, आरोग्य, महिलांचे प्रश्न अशा विविध प्रश्नांवर त्यांनी चांगले काम केलेले आहे. ते सातत्याने नाविन्यपूर्ण काम करण्यात अग्रेसर असतात. असेच त्यांच्याकडे आरोग्याचा विषय घेऊन जाणाऱ्या व्यक्तीला ते नेहमी सहकार्यची भावना मनात ठेवत मदतीचा हात देत आहेत.

आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील शहादेव नरवडे यांची गेल्या अनेक दिवसांपासून गुडघ्याचा जॉईंटाचा त्रास होत असल्याकारणाने त्यांनी दोन ते तीन वेळा मुंबई व पुणे येथे ऑपरेशन केले. परंतु त्यावरही त्यांचा त्रास कमी झाला नाही. त्यानंतर त्यांना डॉक्टरांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिल्याने या ऑपरेशनसाठी पाच ते सहा लक्ष इतका खर्च खाजगी रुग्णालयांमध्ये येत होता तेव्हा त्यांनी आ. सुरेश धस यांची भेट घेत आपल्या वेदना सांगताच तात्काळ आमदार सुरेश धस यांनी या रुग्णाची मदत करण्याच्या हेतूने मुंबई येथील नामांकित हॉस्पिटलमध्ये विविध ट्रस्ट व मुख्यमंत्री सहायता निधीसह धर्मादाय यांच्याशी संपर्क करत विविध माध्यमातून मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली. आ. सुरेश धस हे रुग्णांचा ईलाज करण्यासाठी त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यासाठी रुग्णसेवा देण्यासाठी नेहमी तत्पर असतात, ज्या गरिबांजवळ असाध्य रोगांवर उपचार करवून घेण्यासाठी



पैसा नाही, ज्यांना मरणाशिवाय पर्याय नाही अशा रुग्णांना मदतीचा हात देण्याची भावना मनात असल्याने मतदार संघातील ग्रामीण भागांत राहणाऱ्या गरीब व कोणीही वाली नसलेल्या रुग्णांना स्वास्थ्य सुविधा पुरवविण्याचे काम करीत आहे.याच उदात्त भावनेने शहादेव नरवडे यांना ६ लाख रुपयांची मोफत शस्त्रक्रिया मुंबई येथील रुग्णालयात आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून यशस्वी करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर नरोडे हे ठणठणीत बरे झाले असून आमदार सुरेश धस यांच्या या जागरूक पणामुळे फार मोठा आरोग्याचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे नरवडे परिवाराने आभार मानले.